19 DEC 2017

क्र-पोअवा/पशा-3/मराठी भाषा संवर्धन पंधरवडा/ 01जाने ते 15 जाने//2017 8972 वाशिम दि.

**संदर्भ** :- मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र क्रमांक-
क्र-कक्ष-18/क.लि./विविध/कावि-1652/2017-दिनांक-02.12.2017.

**विषय** :- **01 जानेवारी ते 15 जानेवारी, 2017 हा "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"**साजरा करण्याबाबत.

--**--

उपरोक्त संदर्भ व विषयान्वयें, आपणास कळविण्यात येते की, मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व भाषेच्या संवर्धनासाठी राज्यभर, दरवर्षी प्रमाणे या वर्षी **01 जानेवारी ते 15 जानेवारी, 2017 हा "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्याचे, शासन निर्णय क्र.मभापं-2015/प्र.क्र.70/भाषा-2/मंत्रालय, मुंबई दि.22. 07.2015अन्वयें, शासन निर्णय प्राप्त झालेले आहे, तसेच शासन परिपत्रक क्रमांक-मभापं-2017/प्र.क्र.109/भाषा-2/मुंबई दि.23.11.2017अन्वयें, दिलेल्या शासन निर्णयाच्या निर्देशानुसार विविध नाविन्यपूर्ण उपक्रम खालील सुचनाप्रमाणे आयोजित करुन, तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(1)राज्यामध्ये मराठी भाषेचा सार्वत्रिक वापर करण्याच्या दृष्टीने सदर पंधरवडयात सर्व संस्था/कार्यालये यांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करावे, यामध्ये सर्व मंत्रालयीन विभाग व विभागाच्या अधिपत्या खालील सर्व क्षेत्रीय कार्यालये/ महामंडळे/स्थानिक संस्था, राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्या खालील सर्व कार्यालये/महामंडळे/उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बॅक यांनी सक्रीय सहभाग घ्यावा.

(2) सर्व मंत्रालीयन विभागांनी आपले कार्यालय व विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांना "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करावा.

(3) सर्व शाळा व महाविद्यालये यांनी त्यांच्या स्तरावर सदर पंधरवाडयात भाषा संवर्धनाकरिता विविध परिसंवाद/ व्याख्याने/ स्पर्धा/कार्यशाळा/शिबीर यांचे औचित्यपूर्ण आयोजन करावे.

(4) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने संबंधित तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन तसेच ग्रंथ प्रदर्शन, कथाकथन, काव्य वाचन इत्यादीचे आयोजन करावे.

(5) शाळा/महाविद्यालये यांनी आपल्या विद्यार्थ्यांसहित पुस्तकाचे गांव भिलार येथील प्रकल्पास भेट दयावी.

(6)राज्यातील अमराठी भाषिकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचर करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा/स्पर्धा इत्यादी आयोजन करावे.

(7) त्रिभाषा सुत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारित्यातील सर्व कार्यालये/मंडळे/सार्वजनिक उपकम यांनी मराठीचा वापर करणे अनिवार्य आहे. तरी याबाबतची जागरुकता निर्माण करण्याकरिता सदर कार्यालयांनी या पंधरवडयात विविध नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करावे.

(8) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयानी आपल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून याबाबतचे संदेश प्रसारित करावेत.

या कार्यक्रमाकरिता येणारा खर्च संबंधित विभाग/कार्यालयांनी चालू वित्तीय वर्षात कार्यालयीन खर्चासाठी मंजुर करण्यात आलेल्या अनुदानातून करावा.

( मोक्षदा पाटील )
पोलीस अधिक्षक, वाशिम

**प्रती,**

अपर पोलीस अधिक्षक, वाशिम
पोलीस उपअधिक्षक (गृह), पोलीस अधिक्षक, कार्यालय वाशिम
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय वाशिम/पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण निधी वाशिम.
उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम/कांरजा/मंगरुळपीर/ सर्व ठाणेदार वाशिम जिल्हा
पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा/जिल्हा विशेष शाखा/जिल्हा वाहतुक शाखा/कल्याण शाखा/ बिनतारी संदेश विभाग/पोलीस नियंत्रण कक्ष/पोलीस उप निरीक्षक, तंटामुक्त गांव मोहिम शाखा/पो.अ.यांचे वाचक शाखा/अ.पो.अ.यांचे वाचक शाखा/कार्यालय अधिक्षक/उच्च टंकलेखक/ सहा.लेखा.अधिकारी पो.अ.कार्यालय वाशिम /महामार्ग अमानी/संगणक कक्ष विभाग/सायबर विभाग/ रा.गु.अ.वि.वशिम/महिला तक्रार निवारण कक्ष/अे.सी.बी.वाशिम/ना.ह.स.विभाग /बि.डी.डी.एस./ मोटार परिवहन विभाग/प्रबंधक लिपीक/आकस्मिक लिपी/रोखपाल/पो.क.नि.लिपीक/पो.अ.कार्या, वाशिम.

---***---

आवक/जावक क्र.--639--
22/12/17